रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
RESERVE BANK OF INDIA


**सर्वाधिकार**
पुनर्मुद्रण करण्याची परवानगी आहे, परंतु स्त्रोताची माहिती दिली जावी.

**दावा अमान्य**
सर्वसामान्य लोकांना सामान्य माहिती व मार्गदर्शन करणे हा भारतीय रिझर्व्ह बँकेचे वित्तीय शिक्षण देण्यामागचा प्रयत्न आहे. ह्या माहितीचा उपयोग करताना उपयोगकर्त्या व्यक्तीने स्वत: सावधानता बाळगावी व निर्णय घ्यावा.

जुलै २००७

# मनी कुमार

## मौद्रिक नीति




**श्रेणीनुसार वित्तीय शिक्षण**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in




मला फार चांगली नोकरी मिळाली आहे. परंतु मी नक्की काय करतो ते लोकांना माहित नाही. कित्येकांना वाटते की आरबीआय ही सरकारी संस्था आहे जिचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही. परंतु ती कशी आहे त्याचे हे उत्तर नाही. आरबीआयमधे मी जी काही बारिकसारिक कामे करतो त्याचा संपूर्ण देशावर परिणाम होतो. सर्वात गरिब शेतकऱ्यापासून ते श्रीमंत व्यावसायिकापर्यंत. एक चुकीची उपाययोजना गंभीर स्वरूपाचे परिणाम घडवून आणू शकते! त्याचसाठी आमच्याकडे आर्थिक धोरण आहे. आता तुम्ही अंदाज लावू शकता, की हे अतिशय रसभरित काम आहे व त्यात खूप जबाबदाऱ्या आहेत. जर तुम्हाला अधिक माहिती हवी असेल तर आरामशीर टेकून बसा, वाचा आणि आनंद घ्या!



## आरबीआयबद्दल वस्तूस्थिती !

रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ अन्वये १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली. तिचे मध्यवर्ती कार्यालय सुरूवातीला कलकत्यात होते, परंतु ते १९३७ साली कायमस्वरूपी मुंबईत स्थलांतरित करण्यात आले. सुरूवातीला ती जरी खाजगी मालकीची होती तरी १९४९ साली राष्ट्रियीकरण करण्यात आल्यानंतर ती संपूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची झाली.




वर्गात मुले कंटाळून बसलेली असतात.
अर्थव्यवस्था
• आर्थिक धोरण
• परकीय चलन व्यवस्था कायदा
• किंमतीतील चढउतार
• आर्थिक स्थैर्य
आज तुमच्यासाठी एक गंमत आहे. हे मनीकुमार, यांचे स्वागत करा.
नमस्कार!
या मनीकुमार! माझ्या वर्गाला आर्थिक धोरण समजावून सांगण्यासाठी मी तुम्हाला बोलावले आहे.
मी त्यांना आर्धिक धोरणाचे ३ मुख्य हेतू सांगितले आहेत. चलनवाढ आटोक्यात ठेवणे, आर्थिक वाढीला उत्तेजन देणे, व आर्थिक स्थैर्य.
हे फारच गुंतागुंतीचे आहे. आपल्या सर्वांकडेच भरपूर पैसे का नसावेत, ज्यामुळे सगळेच मजेत राहतील.
का नको ?
तुम्हाला काय अडचण आहे ?
ओह, नको.
ठीक आहे ! तुम्हाला वाटते की भरपूर पैसे असले, म्हणजे सगळे सुखी राहतील.




तो त्याचा हात गोल फिरवतो आणि ते सगळे जण एका नव्या जगात पोहोचतात.
तेव्हा आता आपण आपल्या वर्गाच्या सहलीला जाऊ या!
खेळ
चित्रपटगृह
जेथे सगळीकडे पैसे आहेत अशा जगात तुमचे सर्वांचे स्वागत असो. तुम्हाला हवे तितके पैसे घ्या, आणि तुम्हाला हवे ते करा. तेव्हा आता मला सांगा, तुम्हाला किती पैसे हवे आहेत?
५०० रुपये! आम्हाला जे जे हवे ते सर्वकाही आम्ही खरेदी करू.
ठीक आहे.
विद्यार्थी पैशाचा आनंद घेतात
व्ही डी ओ गेम


मुले खेळ खेळण्यासाठी रांगेत उभी राहतात. प्रत्येक खेळासाठी रु.१०० लागतील, हे तर परवडणारे आहे.
खेळ
रु.१००/-
हळूहळू, खूपशी इतर मुलेही रांगेत उभी राहतात.
आणि जशी मागणी वाढते, तशी किंमत देखिल वाढत जाते.
खेळ
रु.१५०/-
खेळ
रु.२००/-
रु.३००/-
काही मुलांना ते परवडू शकते.
परंतु बहुतेकांना ते परवडत नाही.
आम्हाला जे हवे ते करता येत नसेल तर मग पैसे असून काय उपयोग?
ते अजून यंत्र का उपलब्ध करू शकत नाहीत. त्यामुळे आम्हाला सर्वांना खेळता येईल?


परंतु जागेचं काय? आपल्या सर्वांना उभे राहण्यासाठी ह्या खोलीत फार थोडी जागा शिल्लक आहे, ते अजून यंत्र कुठे ठेवतील?
मनी कुमार!!!
मनी कुमार!!!
मनी कुमार!!!
असे का होतं, की आमच्यापाशी भरपूर पैसे असूनही आम्हाला जे हवे ते करायला परवडत का नाही? पुरेशा गोष्टी उपलब्ध का नाहीत?
अचानक मनी कुमार प्रगट होतो.
जेव्हा भरपूर पैसे असतात परंतु वस्तू कमी असतात तेव्हा असेच होते. ह्याला फुगवटा असे म्हणतात! फुगवटा?
मुद्रास्फीति! इंफ्लैशन?
असे का झाले?
जेव्हा खूप पैसे कमी वस्तूंच्या मागे लागतात, तेव्हा त्या वस्तूंच्या किंमती वाढतात. ह्याला फुगवटा म्हणतात. त्याचा सर्वांना फटका बसत असला तरी सुद्धा गरीबांना त्याचा जास्त फटका बसतो.
कारण, गरीबांचे संरक्षण करण्यात आलं नाही. ते त्यांच्या रोजच्या उदरनिर्वाहासाठी पैसे कमवतात आणि पावसापासून रक्षण करण्यासाठी तरतूद करू शकत नाहीत.
ह्यासाठी तू काही करू शकत नाहीस का?
अर्थात, मी करू शकतो! इकडे या, मी तुम्हाला काहीतरी दाखवतो!


तो त्यांना आरबीआयच्या मुख्य कार्यालयातल्या नियंत्रण कक्षात घेऊन जातो.
रिझर्व बँक ऑफ इंडिया
RESERVE BANK OF INDIA
आरबीआयमधे आम्ही हेच करतो.
तो व्याजाचे दर वर चढवतो...
व्याज दर
एका पडद्यावर दृश्य दिसू लागते की बँकेकडून बाजारात वाहणारा पैशाचा वेग मंदावतो आहे कारण लोकांचे बँकेकडून कर्ज घेणे कमी होते.
बँक
त्यानंतर तो इतर बटने कमीअधिक सरकवतो त्यामुळे बाजारातला प्रमाणापेक्षा अधिक असलेला पैसा त्याच्या यंत्रात शोषून घेतला जातो.
चलनिधि
आता पडद्यावर व्हिडिओ गेम पार्लर दिसू लागतो. व्हिडिओ गेम यंत्रांपाशी असलेली रांग कमी होऊ लागते आणि तिकिटांचे दर देखिल.
रु.१००/-
आरबीआय किंमतीत होणारी वाढ संपूर्णपणे थांबवू शकत नाही. परंतु किंमती वेगाने वरखाली होणार नाहीत ह्याची ती काळजी घेऊ शकते. अशा प्रकारे लोकांना जूळवून घेण्यास भरपूर वेळ मिळतो आणि त्यांच्या भविष्यासाठी पुरेसे पैसे वाचवता येतात.


लोकांना होणाऱ्या पैशाच्या उपलब्धतेवर नियंत्रण ठेवून ह्याद्वारे किंमतीत स्थैर्य राखले जाते. अधिक पैसे उपलब्ध करून किंवा बँकांमधला अधिक पैसा काढून घेऊन ती असे करू शकते.
ती पैशाचे मूल्य देखिल कमी किंवा जास्त करू शकते. म्हणजे व्याजाच्या दराद्वारे लोकांना खर्च करण्यासाठी उपलब्ध असलेल्या पैशावर नियंत्रण ठेवू शकते.
अजूनही हे खूप किचकट वाटते का?
नाही, मनी कुमार! आता किंमतीचे स्थैर्य आम्हाला समजले आहे.
पुन्हा वर्गात परत येतात.
जेव्हा अमर्याद पैसा उपलब्ध झाला तेव्हा तुम्हाला काय मिळाले?
हां!
अमर्याद त्रास !!!
हां!
हां!
. . . आणि सर्वजण जोरजोरात हसू लागतात !!!


तेव्हा तू किंमतीत स्थैर्य राहिल ह्याची काळजी घेतोस?
होय, आणि असे करून देशाचा विकास धीम्या गतीने होत राहिल ह्याची काळजी मी घेतो.
धीम्या गतीने? का? जर भारताचा विकास वेगाने आणि भरमसाठ झाला तर काय समस्या आहे?
मला काही समस्या नाही. परंतु जर विकास धीम्या गतीने झाला नाही तर त्यामुळे गंभीर स्वरूपाचे परिणाम होऊ शकतात.
ते कसे काय?
तुम्हाला ते पहायचे आहे?
तो त्याचा हात गोल फिरवतो आणि त्यांचा एका नव्या विश्वात प्रवेश होतो
ह्या विश्वात प्रवेश करा जेथे सर्व सूत्रे तुमच्या हातात असतील. जर काही त्रास झाला तर मला बोलवा.
आरबीआयच्या नियंत्रण कक्षात.
आपण अधिक विकासाला प्रोत्साहन देऊ या. सगळ्या कंपन्यांना उत्पादन वाढवायला आणि सगळ्या लोकांचे उत्पन्न वाढवायला सांगा.


ते एक बटन दाबतात आणि कॉर्पोरेट प्रमुख व्यक्ती दिसू लागतात.
बंधू आणि भगिनींनो, इकडे लक्ष द्या! देशाचा विकास व्हावा असे आम्हाला वाटते. तेव्हा तुमचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करा.
परंतु तसे करण्यासाठी आम्हाला अधिक साधनसामग्रीची गरज आहे.
तुम्हाला साधनसामग्रीचे हवे तितके खोके घ्या.
त्यांच्या सूचनांनुसार कामगार त्यांना हवे तितके साधनसामग्रीचे खोके घेऊन जातात.
अधिक साधनसामग्रीच्या सहाय्याने कारखाने भरपूर उत्पादन करतात.
दुकाने वस्तूंनी गच्च भरतात आणि लोकांकडे त्या खरेदी करायला भरपूर पैसे येतात.


गगनाला भिडणारा विकास!
नोकऱ्यांच्या उपलब्धतेचा उच्च दर!
विद्यार्थी त्यांच्या यशाबद्दल आनंद साजरा करत असतात . . .
एक घंटा होते आणि त्यांना मधे थांबवले जाते. काय घडत आहे हे पाहण्यासाठी ते मुख्य पडद्याकडे वळतात.
साधनसामग्रीला मर्यादा पडली आहे. आता यापुढे उत्पादन वाढविता येणे शक्य नाही.
खूप नोकऱ्या म्हणजे अधिक खर्च करणे. आणि अधिक मागणीमुळे फुगवटा निर्माण होतो. आता, थैली भरुन पैसे असूनही लोकांना वस्तू खरेदी करता येत नाहीत.
मनी कुमारला चिंता वाटू लागते. . . .
परंतु विद्यार्थी त्याला बोलावतात का ह्याची तो वाट पहात थांबतो.


वस्तू विकल्या जात नसल्यामुळे, कारखाने त्यांचे उत्पादन कमी करतात आणि कामगारांना तात्पुरते कामावरुन कमी करतात.
अधिक बेकारी म्हणजे विक्री अधिक कमी
. . . कारखाने जबरदस्ती बंद करावे लागतात.
CLOSE
अर्थव्यवस्थेत अशी मंदी येते, जेथून बाहेर येण्यास तिला खूप वेळ लागतो.
परिस्थिती अधिकाधिक वाईट होत जाते. ज्या व्यक्तींना वस्तू खरेदी करता येत नाहीत त्या दंगा आणि लुटालूट करतात.
परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाते!


विद्यार्थी मनी कुमारला बोलावण्याचा निर्णय घेतात.
विकास कोसळतो !!!
मोठ्या प्रमाणात
बेकारी वाढते !!!
मनी कुमार!!!
चक्, चक्, चक्, . . असे दिसते की तुम्ही खूप समस्या निर्माण केल्या आहेत.
आम्हाला खात्री आहे की ह्याबाबतीत तू काही तरी करु शकतोस.
मला भीती वाटते की, मी चटकन सर्वकाही नीटनेटके करू शकणार नाही. अर्थव्यवस्था पूर्ववत होण्यासाठी काही वेळ लागेल. परंतु मध्यंतरी जो त्रास होईल . . . नशिब, हे काही खरं विश्व नाही!!!
आता आपण पुन्हा खऱ्या विश्वात जाऊ या जेथे आरबीआय सर्व गोष्टींवर बारिक लक्ष ठेवते!


तेव्हा मनी कुमार त्यांना पुन्हा खऱ्या विश्वात घेऊन येतो.
आता पहा, आरबीआयमधे आम्ही बऱ्याच गोष्टी करतो. तुम्ही आमच्याशी थेट व्यवहार करत नसाल. पण आम्ही नेहमीच तुमच्याशी व्यवहार करतो.
आमच्या धोरणांचा तुमच्या जीवनातल्या प्रत्येक पैलूवर परिणाम होतो. तरी सुद्धा लोकांना ते लक्षात येत नाही. मला आता विश्वास वाटतो की तुम्हाला आता आरबीआयच्या भूमिकेची प्रशंसा कराल.


आता, आर्थिक धोरणाचा तिसरा आधारस्तंभ मी स्पष्ट करून सांगते - वित्तीय स्थैर्य.
परंतु, सामान्य माणसाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. मला खात्री आहे की ते तितके महत्त्वाचे नाही.
शिक्षक पुन्हा प्रयत्न करतात परंतु विद्यार्थ्यांना काही समजत नाहीत.
ते सर्व एका सुरात मागणी करतात.
मनी कुमार! तू का समजावून सांगत नाहीस?
हं, तुम्हाला सर्वांना सहलीला जायचे आहे. हो ना?
ठिक आहे . . . तुम्ही सगळे सहलीला जा आणि मलाही जरा सुट्टी घेऊ द्या.
वा! फार छान!
होय!
होय, नक्की, आम्हाला असे जग पहायचे आहे जेथे तू रजेवर आहेस.
मनी कुमार त्यांना एक थैली भरुन पैसे देतो आणि त्यांना दुसऱ्या जगात पाठवून देतो.



राहूल, टिना आणि अरूण त्यांच्या स्वप्नातल्या विश्वात पैशाची मोठी थैली घेऊन खूप आनंदात असतात!
रुपये
ही खूप जड आहे. मला वाटत की मी ती बँकेतच ठेवावी.
तेव्हा टिना तिचे पैसे बँकेत ठेवते.
मध्यंतरी, राहूलला एक सुंदर मोपेड दिसते.
त्याला ती खरेदी करायची असते, परंतु त्याच्याकडे पैसे कमी असतात.
तेव्हा तो बँकेकडे जातो.
मला मोपेडसाठी काही पैसे उसने हवे आहेत.


घ्या! हे पैसे व्याजासकट परत करा.
बँक मॅनेजर टिनाचे पैसे राहूलला देतो. . . .
तो पैशाचा उपयोग मोपेड खरेदी करण्यासाठी करतो.
एक आठवड्यानंतर
ए राहूल! तुझी मोपेड छान आहे!
तू सुद्धा एक विकत घे!
टिना तिचे पैसे परत आणायला जाते.
मला माझे पैसे काढून घ्यायचे आहेत.
पण मी तुमचे पैसे दुसऱ्या व्यक्तीला दिले आहेत. माझ्यापाशी आता पैसे नाहीत...
. . .आणि मनी कुमार, जेव्हा आमच्यापाशी पैसे कमी असतात जेव्हा जो नेहमी पैसे देतो, तो रजेवर आहे.
टिना नाराज होते!


आणि ती एकटीच नाही . . .
बँक
मी माझ्या आयुष्यातली सगळी बचत ह्या बँकेत ठेवली होती. आता मला माझे पैसे परत मिळत नाहीत.
मी आता माझ्या मुलांचे शिक्षण कसे करू?
मला जर माझे पैसे परत मिळाले नाहीत तर मी माझ्या पत्नीची शस्त्रक्रिया कशी करू?
बँक मॅनेजरने दिलेली कर्ज वसूल करण्यात बँक अयशस्वी ठरत आहे.
ठेवी ठेवायला आलेल्या लोकांना भीती वाटू लागते.
मी माझे पैसे येथे का ठेवू? माझे सुद्धा पैसे वाया जातील.
टीनाला असहाय्य वाटू लागते.
मध्यंतरी . . .
ए अरुण! तू सुद्धा एक खरेदी करावीस.
वा! मोपेड छान आहे.



अरुण अजून एका बँकेकडे कर्जासाठी धाव घेतो.
मला मोपेड खरेदी करण्यासाठी काही पैसे उसने हवे आहेत.
माफ करा! आमच्याकडे पैसे नाहीत. मला जे पैसे परत येतील अशी अपेक्षा होती ते पैसे माझ्या साहेबांनी परत केले नाहीत. आणि अशा परिस्थितीत पैसे पुरवणारा मनी कुमार रजेवर आहे.
अरुण नाराज होतो.
तो एकच जण नाही, ज्याला कर्ज मिळाले नाही .
बँक
मी माझ्या मुलीचं लग्न कसं करू?
मला घर खरेदी करायला पैसे हवे आहेत. आता मी ते कसे खरेदी करू?
ह्या सगळ्या गोंधळात राहूल, टिना आणि अरुण एकमेकांना भेटतात.
फक्त मनी कुमारच ही समस्या सोडवू शकतो.
मनी कुमार !!!

असे दिसते की माझ्या सुट्टीचा खूप गंभीर परिणाम झाला आहे.
मनी कुमार. काय होत आहे हे मला कळत नाही. बँकांना काय झालं आहे? तू काही ह्यासाठी करू शकतोस का?
हो, मी करू शकतो!
तो त्यांना नियंत्रणकक्षाकडे घेऊन जातो.
'भांडवल' नावाचे तो एक बटन दाबतो आणि आरबीआयकडून बँकेकडे पैसे वाहू लागतात.
आरबीआय
बँक
बँक
त्यानंतर तो काही महत्त्वाचे संपर्क साधतो.
?
?
?
असे काम करा. . जोखमीचे मूल्यमापन. .सारासार धोरण. . भांडवलाची योग्य उपलब्धता. . चांगली कामगिरी न करणारी कर्जेवसूल करा . .


बँक मॅनेजर संमतीदर्शक मान हलवतो.
आणि हळूहळू, बँक पुन्हा सक्षम बनते.
बँक ऑफ
ग्राहक बँकेत गर्दी करतात. काही ठेवी ठेवतात. काही पैसे उसने घेतात.
ठेव विमा
बैंक
मनी कुमार त्यानंतर बँकेच्या डोक्यावर एक मोठी संरक्षक छत्री धरतो ज्याला ठेव विमा म्हणतात.


शेवटी सर्व काही सुरळीत झाले.
असे पहा, की बँका सुरक्षित असल्याखेरिज लोकं त्यात पैसे ठेवत नाहीत. आणि तसे झाले तर उत्पादने बनविण्यासाठी इतर लोकांना पैसे देण्यासाठी बँकेकडे पैसे नसतील. जर असे घडले, तर अर्थव्यवस्था कशी चालेल, आणि ती विकास कशी होऊ देईल? त्यामुळे, मला पडद्यामागे रहावे लागते आणि बँका व्यवस्थित कार्य करत आहेत ह्याची काळजी घ्यावी लागते.
हं, आलं लक्षात येतं की बँका चांगल्या प्रकारे काम करत आहेत ह्याची काळजी घेऊन, तुम्ही ज्यांच्यापाशी अधिक पैसे आहेत त्यांच्याकडून ते घेऊन ज्यांना त्याची गरज आहे त्यांना ते देता जेव्हा लोकं पैसे परत करतात, तेव्हा दुसरे कोणीतरी ते घेऊ शकतात आणि अशा प्रकारे हे काम चालत रहाते.
अगदी अचूकपणे, असे घडत राहू शकते जर लोकांचा त्यांचे पैसे ठेवण्यासाठी बँकांवर विश्वास असेल. तेव्हा अशा प्रकारे तुम्हाला वित्तीय स्थैर्य मिळते.
वा! . . . मग आता पुढे काय?